**प्रतिवादी क्र. २ तर्फे साक्षीदार क्रं. १ यांचा सरतपास प्रतिवादी क्रं. २ चे वकिल श्री. डी.व्ही.फुसे यांचे मार्फत सुरुः—**

४. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

सरतपास संपला.

**उलटतपास वादीचे वकिल श्री. एन.पी.धोपे यांचे मार्फत सुरुः—**

५. मला मराठी वाचता व लिहता येते. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. मी महादेव शामराव फुसे यांना ओळखत नाही. माझ्या वडिलांचे नांव मोतीराम महादेव फुसे असे आहे. माझ्या काकांचे नांव रामदास महादेव फुसे असे आहे. मोतीराम व रामदास ही महादेव शामराव फुसे यांची मुले आहेत. मोतीराम यांना राजेंद्र, महेंद्र व प्रविण अशी तीन मुले आहेत. वादी दिव्या फुसे हिचे वडील नामे राजेंद्र फुसे हे मरण पावले आहेत. राजेंद्र फुसे हे मरण पावल्यानंतर वादी दिव्या हिची आई माधुरी हिने दुसरे लग्न केले आहे. ती तिच्या दुसऱ्या पतीकडे नांदत आहे का ही बाब मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी ही माझा सख्खा भाउ राजेंद्र याची सख्खी मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हि तिच्या जन्मापासून तिच्या मामाकडे पथ्रोट येथे राहते. ती कोठे राहते हे मला माहित नाही. तिचे शिक्षण कोठे झाले हे मला माहिती नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्यातील संपूर्ण वाद मिळकत ही माझे वडील मोतीराम यांना त्यांच्या वडिलांकडून आलेली मिळकत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर मिळकत माझ्या वडिलांनी विकत घेतली आहे. सदर मिळकतीचे खरेदी खत मी या प्रकरणात दाखल करु शकतो काय या बाबत मला माहिती नाही. हे मला मान्य नाही की, सर्व वाद मिळकती या आमच्या वडिलोपार्जीत मिळकती असल्यामुळे त्यामध्ये वादीचा <u>१/४</u> हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व वाद मिळकती या वडिलोपार्जीत मिळकती

आहेत व त्यामध्ये वादीचा १/४ हिस्सा आहे याची मला माहिती असतांनाही मी त्या मिळकतीचे खोटे बक्षीस पत्र व खरेदी खत केले आहे. हे मला माहित नाही की, मी सदर बक्षीस पत्र व खरेदी खत करतांना वादी दिव्या हिची लेखी किंवा तोंडी संमती घेतली नाही. मी माझ्या वडिलांना खरेदी खताचा मोबदला रोख स्वरुपात दिला आहे. मी तो मोबदला धनादेशा मार्फत दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या वडिलांना रोख स्वरुपात मोबदला दिला की, धनादेशाव्दारे दिला हे दाखविणारे कोणतेही दस्त मी या प्रकरणात दाखल केले नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा वाद मिळकतीतील हिस्सा डावलण्यासाठी प्रतिवादी क्र. १ कडून खोटे व बनावटी खरेदी खत व बक्षीस पत्र करुन घेतले. हे मला माहित नाही की, मला किंवा माझ्या वडिलांना सदर बक्षीसपत्र व खरेदी खत करुन घेण्याचा व करुन देण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला वाद मिळकत ही वडिलोपार्जीत आहे याची संपूर्ण माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा हिस्सा डावलण्यासाठी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/—
( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.

माझे समक्ष

स्वा/—
( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.
दि.०६.०२.२०२६.

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे साक्षीदार क्रं. १ यांचा सरतपास प्रतिवादी क्रं. ३ चे वकिल श्रीमती डी.आर.टेंबले यांचे मार्फत सुरुः—**

**६.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. मी या प्रकरणात निशाणी ४१ या यादीसोबत नियमित दिवाणी दावा क्र. ७४/२०२० या प्रकरणातील दिनांक १८.०३.२०२५ रोजी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या यादीची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ४५** देण्यात येते.

सरतपास संपला.

**उलटतपास वादीचे वकिल श्री. एन.पी.धोपे यांचे मार्फत सुरुः—**

**७.** माझया वडिलांचे नांवे मोतीराम महादेव फुसे असे आहे. मोतीराम यांना राजेंद्र, महेंद्र व प्रविण अशी तीन मुले आहेत. वादी दिव्या फुसे हिचे वडील नामे राजेंद्र फुसे हे मरण पावले आहेत. राजेंद्र फुसे हे माझे भाउ होते. वादी ही माझा सख्खा भाउ राजेंद्र याची सख्खी मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाउ राजेंद वारल्यानंतर वादीची आई माधुरी राजेंद्र फुसे हिने दुसरे लग्न केले. हे म्हणणे खरे आहे की, वादी जन्मापासुन पथ्रोट येथे तिच्या मामाकडे राहते व तिचे शिक्षण तेथेच झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही प्रतिवादींनी आज पर्यंत वादीला तिचा हिस्सा दिलेला नाही किंवा तिला शिक्षणासाठी आर्थीक मदत केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत ही माझ्या वडिलांना त्यांच्या आजोबाकडून मिळाली होती. माझे असे म्हणणे आहे की, माझ्या वडिलांनी सर्व वाद मिळकत स्वतःहा विकत घेतल्या आहे. त्या मिळकती माझ्या वडिलांनी कोणाकडून विकत घेतल्या हे मला सांगता येणार नाही. मी त्या मिळकतीचे खरेदी खत दाखल करु शकत नाही.

६. वाद मिळकती या माझ्या वडिलांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत हे दाखविण्याकरीता मी कोणताही कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केला

नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व वाद मिळकती हया वडिलापार्जीत मिळकती असून त्या माझ्या वडिलांच्या स्वकमाईच्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा हिस्सा डावलण्यासाठी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

७. आता मला माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ व ५ मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला. तो मजकुर मी माझा लेखी जबाब तयार करतांना माझया वकिलांना सांगितला होता. तो मजकुर माझ्या लेखी जबाबात नाही व तो मी पहिल्यांदा पुराव्याच्या शपथपत्रात का सांगत आहे यांचे कारण मला सांगता येणार नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
|---|---|
| स्वा/— | स्वा/— |
| ( महेश एस. काळे ) | ( महेश एस. काळे ) |
| सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) | सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) |
| अकोट. | अकोट. |
| दि.०६.०२.२०२६. | दि.०६.०२.२०२६. |